**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ यांची साक्ष.**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**नाव** - पंकज डोमाजी कोल्हे

**वय** - २९ वर्ष, **व्यवसाय** - हातमजूरी

**पत्ता** - खापा, तह. सावनेर, जि. नागपूर.

**सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.एन. डेकाटे यांच्यामार्फत.**

दि. १४.०३.२०२५ रोजी पोलिसांनी मला सिरोंजी येथे सायंकाळी बोलावले होते. जागेवर गेल्याचा पंचनामा होता. सदरचा पंचनामा राठोड साहेबांनी केला. मला मोका पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो **निशाणी क्र. ४१** वर आहे.

**२.** दि. १६.०३.२०२५ रोजी पोलिसांनी मला सिरोंजी येथे सायंकाळी बोलावले होते. जागेवर गेल्याचा पंचनामा होता. मला मोका पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो **निशाणी क्र. १९** वर आहे.

**३.** दि. १७.०३.२०२५ रोजी माझ्यासमक्ष अटक करून अटक पंचनामा केला. मला आरोपींचे नावे माहित नाही. सदरचा अटक पंचनामा मला दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो **निशाणी क्र. ४२** वर आहे.

**४.** दि. १७.०३.२०२५ रोजी कोणाचा अंग झडती पंचनामा झाला हे मला माहित नाही. तो शेलार यांनी घेतला. साक्षीदार पुन्हा सांगतो की नंदू याची अंग झडती झाली होती. तो मला दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो **निशाणी क्र. ४३** वर आहे.

**५.** दि. १४.०३.२०२५ रोजी केलेल्या जप्तीनाम्यामध्ये काय लिहिले आहे हे मला माहित नाही. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. तो **निशाणी क्र. ४४** वर आहे.

**६.** दि. १७.०३.२०२५ रोजीचा जप्ती पंचनाम्यामध्ये काय जप्ती केले होते हे मला माहित नाही. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. तो **निशाणी क्र. ४५** वर आहे.

**७.** दि. १७.०३.२०२५ रोजीचा झडती पंचनाम्यामध्ये काय जप्ती केले होते हे मला माहित नाही. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. तो **निशाणी क्र. ४६** वर आहे.

**८.** दि. १९.०३.२०२५ रोजीचा कबूली जबाब कोणी दिला हे मला माहित नाही. कबूली जबाब मला दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. तो **निशाणी क्र. २४** वर आहे.

**९.** दि. १४.०३.२०२५ रोजी आरोपी पंढरी यांच्याकडून जप्ती करण्याकरिता जप्ती पंचनामा करण्यात आला. माझ्यासमोर जप्त केलेल्या वस्तू दाखवल्या नाही. त्या पिशवीत होत्या. पंचनाम्यामध्ये काय जप्ती केले होते हे मला माहित नाही. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. तो **निशाणी क्र. ४७** वर आहे.

**१०.** दि. २९.०३.२०२५ रोजीचा झडती पंचनाम्यामध्ये काय जप्ती केले होते हे मला माहित नाही. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. तो **निशाणी क्र. ४८** वर आहे.

**११.** दि. २९.०३.२०२५ रोजीचा दुसरा झडती पंचनाम्यामध्ये काय जप्ती केले होते हे मला माहित नाही. तो कोणाचा होता हे मला आठवत नाही. तो मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. तो **निशाणी क्र. ४९** वर आहे.

**१२.** दि. २०.०३.२०२५ रोजीचा कबूली जबाब कोणी दिला हे मला माहित नाही. तो मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. तो **निशाणी क्र. २५** वर आहे.

**१३.** दि. २०.०३.२०२५ रोजी मेमोरेंडम पंचनामा करण्यात आला. तीन आरोपींचा एकच पंचनामा केला. त्यात काय लिहिले आहे हे मला माहित नाही. तो मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. तो **निशाणी क्र. २६** वर आहे.

**१४.** दि. २१.०३.२०२५ रोजी दुपारी २.३० वाजताचा मोका पंचनामा कोणी केला हे मला माहित नाही. तो मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. तो **निशाणी क्र. ५०** वर आहे.

**१५.** दि. २२.०३.२०२५ रोजीचा जप्ती पंचनामा मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. तो **निशाणी क्र. ५१** वर आहे.

**१६.** दि. २२.०३.२०२५ रोजीचा दुसरा जप्ती पंचनामा मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. तो **निशाणी क्र. ५२** वर आहे.

**१७.** दि. २२.०३.२०२५ रोजीचा कबूली जबाब मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. तो **निशाणी क्र. ५३** वर आहे.

**१८.** दि. २२.०३.२०२५ रोजीचा मेमोरेंडम पंचनामा मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. तो **निशाणी क्र. २७** वर आहे.

**१९.** दि. २३.०३.२०२५ रोजीचा कबूली जबाब मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. तो **निशाणी क्र. ५४** वर आहे.

**२०.** दि. २३.०३.२०२५ रोजीचा मेमोरेंडम पंचनामा मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. तो **निशाणी क्र. २८** वर आहे.

मी आरोपींना ओळखतो. मी त्यांना पाहिले होते. विडीओ कॉफरंसद्वारे जे आरोपी हजर आहेत ते तेच ६ आरोपी आहेत.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीमती. जे.एच.शेंडे यांचेमार्फत</u>**

**२१.** हे म्हणणे खरे आहे की, आज हजर असलेले सहा आरोपींचे नाव किंवा आडनाव मला माहित नाही. नि.क्र. ४१ वरील मोका पंचनाम्यामध्ये काय लिहिले आहे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी जेवढया पंचनाम्यांवर सहया केल्या ते मी वाचले नाहीत. नि.क्र. १९ वरील दि. १६.०३.२०२५ रोजीचा पंचनामा कोणी केला हे मी सांगू शकत नाही व तो कशा बद्दलचा आहे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ४२ वरील दि. १७.०३.२०२५ रोजीचा अटक पंचनामा मी वाचला नाही. नि.क्र. ४३ वरील अंग झडती पंचनाम्यामध्ये कोणत्या रंगाचे कपडे जप्त केले हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, नंदूकडून काय जप्त केले हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. २४ वरील दि. १९.०३.२०२५ रोजीचा कबूली जबाबात काय लिहिले आहे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. २६ वरील दि. २०.०३.२०२५ रोजीचा मेमोरेंडम पंचनाम्यातील मजकूर मी वाचला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी सांगितल्याप्रमाणे मी सहया केल्या.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.01.27 17:35:40 +0530

सावनेर,
दिनांक २७.०१.२०२६

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

नि.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार-वि- पंढरी व इतर
निशाणी क्र. ५४

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe